19 MAY 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून २९८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील आजअखेर २९८ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांत सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. दि. १८ रोजी बी.कॉम., बीए., बीएस्सी. शुगर टेक्नॉलॉजी आदी २० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

19 MAY 2026

पुण्यनगरी

# 'दूरशिक्षण 'बाबत आज ऑनलाईन कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे तीन जिल्ह्यांतील ८९ अभ्यास केंद्रांच्या समन्वयक व लेखनिकांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रवेश प्रक्रियेबाबत मंगळवारी (दि. १९) सकाळी ११ वाजता ऑनलाईन कार्यशाळा होणार आहे, अशी माहिती प्र. संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिली. बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी.व एम.बी.ए. या पारंपारिक व ऑनलाईन अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर ही कार्यशाळा होईल. यावेळी व्ही. बी. शिंदे, दिलीप मोहाडीकर, डॉ. चांगदेव बंडगर, डॉ. सूर्यकांत गायकवाड यांची उपस्थिती असेल, तर डॉ. प्रवीण लोंढे, डॉ. प्रसाद दावणे व संतोष देवेकर मार्गदर्शन करतील, असे कळवण्यात आले आहे.

19 MAY 2026
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## 'पुढारी'कार पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव व्याख्यानमाला

# संरक्षण, सामरिकचे अभ्यासक डॉ. विजय खरे यांचे उद्या व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संरक्षण व सामरिक अभ्यास विभागाचे (डीडीएसएस) वरिष्ठ प्राध्यापक व विभागप्रमुख प्रा. डॉ. विजय खरे हे शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित 'पुढारी'कार पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत पुष्प गुंफणार आहेत. 'अमेरिका-इराण युद्ध : सद्यःस्थिती आणि जागतिक परिणाम' या विषयावर बुधवारी (दि. २०) सायंकाळी ५ वाजता गोविंदराव टेंबे रंगमंदिर, गायन समाज देवल क्लब येथे त्यांचे व्याख्यान होणार आहे.

डॉ. खरे यांना ३० वर्षांहून अधिक शैक्षणिक व संशोधन क्षेत्राचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यांनी पुणे विद्यापीठाचे कुलसचिव म्हणून जबाबदारी पार पाडली आहे. ते सिनेट, विद्या परिषद



सदस्य, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे सदस्य, अभ्यास मंडळाचे सदस्य राहिले आहेत. डॉ. खरे यांचे संरक्षण व सामरिक अभ्यास विभागातील योगदान महत्त्वाचे आहे. त्यांनी राष्ट्रीय सुरक्षा अभ्यासात नवीन पंचवार्षिक एकात्मिक एमए, एमएस्सी अभ्यासक्रम सुरू केला, जो भारतातील पहिलाच प्रयत्न होता. जागतिक शांतता, सुरक्षा व सामरिक अभ्यासात एमए आणि संरक्षण व सामरिक अभ्यासात नऊ विविध पदव्युत्तर पदविका सुरू केल्या आहेत. पुणे विद्यापीठात सप्टेंबर २०१२ पासून आंतरराष्ट्रीय केंद्राचे संचालक म्हणून उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयीकरणासाठीच्या सर्व आंतरराष्ट्रीय उपक्रमांचे ते नेतृत्व करत आहेत.

डॉ. खरे यांनी 'भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा समीक्षात्मक अभ्यास' या विषयावर पीएच.डी. पूर्ण केली. 'भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार' या शीर्षकाखाली पुस्तकरूपात प्रकाशित केले. कॅनडा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशनकडून पहिला आंतरराष्ट्रीय साहित्य पुरस्कार त्यांना मिळाला आहे.

1 9 MAY 2026
सकाळ

# 'त्या' विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ

कोल्हापूर, ता. १८ : गेल्यावर्षी अतिवृष्टी, पूरघोषित केलेल्या कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील विविध २६ तालुक्यांमधील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठाने राज्य शासनाच्या आदेशानुसार घेतला आहे. या शुल्क माफीसाठी संलग्नित महाविद्यालयांकडून विद्यापीठाने प्रस्ताव मागविले आहेत.

या अंतर्गत कागल, शिरोळ, पन्हाळा, करवीर, राधानगरी, गगनबावडा, आजरा, चंदगड (कोल्हापूर जिल्हा), कडेगाव, मिरज, वाळवा, शिराळा, पलूस, तासगाव, कवठेमहांकाळ, विटा, आटपाडी, जत (सांगली जिल्हा), सातारा, कऱ्हाड, पाटण, फलटण, जावळी, कोरेगाव, खटाव, माण (सातारा जिल्हा) येथील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ केले जाणार आहे.

19 MAY 2026

पुढारी

# दूरशिक्षण केंद्र प्रवेश प्रक्रिया; आज ऑनलाईन कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने मंगळवारी (दि.१९) सकाळी ११ वाजता शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यासाठी ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), एम.बी.ए. तसेच ऑनलाईन एम.बी.ए., एम.एस्सी. (गणित) व एम.कॉम. या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. त्या अनुषंगाने ऑनलाईन कार्यशाळा होणार आहे. डॉ. प्रवीण लोंढे, डॉ. प्रसाद दावणे व संतोष देबेकर मार्गदर्शन करणार असल्याची माहिती प्र. संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 MAY 2026
तरुण भारत

# वस्तूसंग्रहालय दिनानिमित्त 'वारसा सफर'ला प्रतिसाद

## कोल्हापूरच्या प्राचीन इतिहास, शस्त्रवैभव आणि कलासंपदेची घेतली माहिती

**। त. भा. प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि कोल्हापूर पुरातत्त्व आणि पुरातत्त्व वस्तूसंग्रहालये संचालनालय मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक वस्तूसंग्रहालय दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विशेष 'वारसा सफरी'ला सोमवारी उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. वि. स खांडेकर स्मृती संग्रांहालय आणि कोल्हापूर विभागीय वस्तूसंग्रहालय कार्यालय यांच्या संयुक्त पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला.

टाऊन हॉल वस्तूसंग्रहालय येथे सकाळी ११.३० ते दुपारी १.३० या वेळेत पार पडलेल्या या वारसा सफरीत संशोधक विद्यार्थी, इतिहासप्रेमी, अभ्यासक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.



**कोल्हापूर : जागतिक वस्तूसंग्रहालय दिनानिमित्त आयोजित 'वारसा सफरी' उपक्रमांतर्गत कोल्हापूरच्या इतिहासाची माहिती देताना मान्यवर.**

यावेळी संग्रहालयातील छत्रपती शाहू महाराज काळातील तसेच मराठा साम्राज्याशी संबंधित दुर्मिळ शस्त्रास्त्रांचे दर्शन घडविण्यात आले.

तलवारी, ढाली, बिचवे, जम्बेया आणि बंदुका यांसारख्या शस्त्रांची माहिती उपस्थितांना देण्यात आली. तसेच कोल्हापूर स्कूल ऑफ आर्टसच्या वैभवाची साक्ष देणारी दुर्मिळ चित्रे पाहून उपस्थित कलाप्रेमी भारावून गेले.

संग्रहालयाच्या संचालिका डॉ. नीलांबरी जगताप यांनी ऐतिहासिक टाऊन हॉल इमारतीचा इतिहास उलगडून सांगितला. ब्रिटिशकालीन वास्तुशैली, इमारतीचे वास्तुविशारद आणि तिच्या निर्मितीमागील उद्देश याबाबत त्यांनी माहिती दिली. तसेच वस्तूसंग्रहालयांची निर्मिती, दुर्मिळ वस्तूंचे संवर्धन, दस्तऐवजीकरण आणि संग्रहालय व्यवस्थापनाच्या विविध पैलूंवर त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

मूर्तीशास्त्र अभ्यासक डॉ. योगेश प्रभूदेसाई यांनी संग्रहालयातील प्राचीन मूर्तींची ओळख, त्यांचे कालखंडानुसार वर्गीकरण, आयुधे आणि मुद्रांवरून इतिहास जाणून घेण्याची पद्धत अत्यंत सोप्या भाषेत समजावून सांगितली.

शस्त्रअभ्यासक अजय चौगुले यांनी मराठाकालीन शस्त्रांचे महत्त्व स्पष्ट करताना शतकानुशतके जुनी शस्त्रे गंजापासून वाचविण्यासाठी करण्यात येणाऱ्या वैज्ञानिक संवर्धन प्रक्रियेची माहिती दिली.

या कार्यक्रमास गड–किल्ले अभ्यासक मानसिंग चव्हाण, इतिहास अधिविभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. उमाकांत हतीकट, समन्वयक उत्तम कांबळे, वसुधा शिंदे, विनायक बोगरे यांच्यासह इतिहास अभ्यासक, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कोल्हापूरच्या गौरवशाली इतिहासाची माहिती

**सफरीदरम्यान उपस्थितांना कोल्हापूरच्या गौरवशाली इतिहासाची आणि संग्रहालयातील दुर्मिळ वारशाची माहिती देण्यात आली. विशेषत: ब्रह्मपुरी उत्खननातून सापडलेल्या सातवाहनकालीन वस्तू, प्राचीन रोमन संस्कृतीशी साधर्म्य दर्शविणारी नाणी, मूर्ती आणि दुर्मिळ अवशेष यांची सविस्तर माहिती तज्ज्ञांनी दिली. कोल्हापूर हे प्राचीन काळापासून आंतरराष्ट्रीय व्यापाराचे महत्त्वाचे केंद्र होते, यावरही प्रकाश टाकण्यात आला.**

19 MAY 2026

तरुण भारत

## शिवाजी विद्यापीठ प्रशासनाचा निर्णय

# अतिवृष्टी पूरघोषित तालुक्यातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफ

त. भा. प्रतिनिधी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये अतिवृष्टी व पूर घोषित केलेल्या तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबतचे परिपत्रक शिवाजी विद्यापीठाने प्रसिद्ध केले आहे.

अतिवृष्टी व पूर घोषित केलेल्या तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्काबाबत परीक्षा मूल्यमापन मंडळ संचालक, विभागीय उच्चशिक्षण सहसंचालक, संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य, पदवी, पदव्युतर अधिविभाग यांची सोमवारी दुपारी ऑनलाईन बैठक झाली. यात विविध विषयांवर चर्चा झाली.

शासन निर्णयानुसार विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्हयातील काही तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. यात अंशतः बाधित तालुक्यांमध्ये कागल, शिरोळ, पन्हाळा (कोल्हापूर) तर पूर्ण बाधित तालुक्यात करवीर, राधानगरी, गगनबावडा, आजरा, चंदगड यांचा समावेश आहे. सांगली जिल्हयातील कडेगाव (अंशतः बाधित), मिरज, वाळवा, शिराळा, पलूस, तासगाव, कवठेमहांकाळ, विटा, आटपाडी, जत यांचा (पूर्णतः बाधित तालुके) समावेश केला आहे. सातारा जिल्हयातील सातारा, कराड, पाटण, फलटण, जावळी हे अंशतः बाधित तर कोरेगाव, खटाव, माण यांचा पूर्णतः बाधित तालुक्यांमध्ये समावेश आहे.

विद्यार्थ्यांचे परिपूर्ण प्रस्ताव विभागीय सहसंचालक यांच्याकडे २० मेपर्यंत सादर करावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.